# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

लोकसत्ता पुणे
शनिवार, १९ ऑगस्ट २०१७

कॅम्पस डायरी

### हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात वनसचेतन शिबिर संपन्न



प्रभात पुणे, शनिवार, दि. १९ ऑगस्ट २०१७ 03

# राजगुरू महाविद्यालयाकडून स्वच्छतामोहीम

## भीमाशंकर अभयारण्य परिसरात वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियान : २१० जणांचा सहभाग

राजगुरुनगर, दि. १८ (प्रतिनिधी)



राजगुरुनगर : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या २१० स्वयंसेवकांनी वनसचेतना शिबिरात भाग घेऊन भीमाशंकर परिसरातील कचरा गोळा केला.

**दहा किलो बियांचे सेंद्रिय पद्धतीने प्रक्रिया करून केले बीजारोपण**

**दुर्मिळ औषधी वनस्पतींची, प्रजातींची घेतली माहिती**

लोकमत
पुणे, शनिवार, दि. १९ ऑगस्ट २०१७ II

# भोरगिरी ते भीमाशंकर वनसचेतन शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : राजगुरुनगर (ता. खेड) येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भोरगिरी ते भीमाशंकर अभयारण्य परिसरात वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियानाचे आयोजन बुधवारी (दि. १६) करण्यात आले. यात सुमारे २१० स्वयंसेवक सहभागी झाले. शिबिराचे हे सलग पाचवे वर्ष आहे.

विद्यार्थ्यांना निसर्गातील जैवविविधतेची माहिती व्हावी आणि पर्यटकांकडून अभयारण्य परिसरात टाकला जाणारा प्लॅस्टिकचा कचरा जमा व्हावा, हा या उपक्रमांमागील मुख्य हेतू होता.

या वेळी विद्यार्थ्यांनी अभयारण्य परिसरात खुरप्याच्या साहाय्याने खड्डे घेऊन करंज, एरंडी, सुबाभूळ, जांभूळ, सीताफळ, करवंद, जट्रोफा, आंबा, चिंच, लिंब, बकाणा, शेवगा, बोर, बाभूळ इ. वृक्षांच्या १० किलो बियांचे सेंद्रिय पद्धतीने बीजप्रक्रिया करून बीजारोपण केले.

विद्यार्थ्यांनी अभयारण्य परिसरात भटकंती करून दुर्मिळ असा 'शेकरू' प्राणी व 'ब्लू मॉरमॉन' फुलपाखराची ओळख करून घेतली. दुर्मिळ औषधी वनस्पती, प्राणी यांच्या जाती-प्रजातींची माहिती करून घेतली. भीमाशंकर अभयारण्य व मंदिर परिसरातील प्लॅस्टिकच्या बाटल्या, पिशव्या आदी घनकचरा जमा केला.



हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भोरगिरी ते भीमाशंकर अभयारण्य परिसरात वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

- विद्यार्थ्यांनी भीमा नदीच्या उगमातील पाण्यातील विरघळलेल्या ऑक्सिजनची मात्रा शास्त्रीय पद्धतीने तपासली. ती १३ पीपीएमपर्यंत आहे. शुद्ध पाण्यातील ऑक्सिजनची कमीत कमी मात्रा ८ पीपीएम आवश्यक असते.

वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियानाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज यांनी केले. या शिबिरात उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. नीलेश बारणे, प्रा. शीतल बोऱ्हाडे, प्रा. दीपिका खांगटे, प्रा. रेश्मा शेंडे, प्रा. प्रतीक्षा तनपुरे, प्रा. गौरी तेलंग व प्रशासकीय सेवक सचिन गायकवाड, अमोल वारणे उपस्थित होते.

पुण्य नगरी
शुक्रवार, १८ ऑगस्ट २०१७ | पुणे 3

# भोरगिरी स्वच्छता अभियानात २१० स्वयंसेवक सहभागी

राजगुरुनगर · प्रतिनिधी

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भोरगिरी ते भीमाशंकर अभयारण्य परिसरात आयोजित वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियानात सुमारे २१० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांना निसर्गातील जैवविविधतेची माहिती व्हावी आणि पर्यटकांकडून अभयारण्य परिसरात टाकला जाणारा प्लॅस्टिकचा कचरा जमा व्हावा हा या उपक्रमामागील मुख्य हेतू असल्याचे प्रा डॉ. संजय शिंदे यांनी सांगितले. भोरगिरी ते भीमाशंकर या मार्गावर विद्यार्थ्यांनी खुरप्याच्या साहाय्याने खड्डे घेऊन करंज, एरंडी, सुबाभूळ, जांभूळ, सीताफळ, करवंद, जेट्रोफा, आंबा, चिंच, लिंब, बकाणा, शेवगा, बोर, बाभूळ आदी वृक्षांच्या १० किलो बियांचे सेंद्रिय पद्धतीने बीजप्रक्रिया करून बीजारोपण केले. तसेच अभयारण्य परिसरात भटकंती करून शेकरू व ब्लूमॉरमॉन फुलपाखराची ओळख करून घेतली. दुर्मीळ औषधी वनस्पती, प्राणी यांच्या जाती-प्रजातींची माहिती करून घेतली. भीमाशंकर अभयारण्य व मंदिर परिसरातील प्लॅस्टिकच्या बाटल्या, पिशव्या आदी घनकचरा जमा केला. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज यांनी आयोजन केले. डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. नीलेश बारणे, प्रा. शीतल -बोऱ्हाडे, प्रा. दीपिका खांगटे, प्रा. रेश्मा शेंडे, प्रा. प्रतीक्षा तनपुरे, प्रा. गौरी तेलंग उपस्थित होते.

१० केसरी पुणे, २१ ऑगस्ट २०१७

# वनसचेतन शिबिर उत्साहात



राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचे भीमाशंकर अभयारण्यात वनसचेतन शिबिर झाले, यावेळी उपस्थित स्वयंसेवक.

( छायाचित्र : किरण खुडे, राजगुरूनगर )

राजगुरूनगर, ( वार्ताहर ) : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भोरगिरी ते भीमाशंकर अभयारण्य परिसरात वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांना निसर्गातील जैवविविधतेची माहिती व्हावी आणि पर्यटकांकडून अभयारण्य परिसरात टाकला जाणारा प्लास्टिकचा कचरा जमा व्हावा हा या उपक्रमामागील मुख्य हेतू होता.

या वेळी विद्यार्थ्यांनी अभयारण्य परिसरात खुरप्याच्या साहाय्याने खड्डे घेऊन करंज, एरंडी, सुबाभूळ, जांभूळ, सीताफळ, करवंद, जेट्रोफा, आंबा, चिंच, लिंब, बकाना, शेवगा, बोर, बाभूळ आदी वृक्षांच्या बियांचे सेंद्रिय पद्धतीने बीजप्रक्रिया करून बीजारोपण केले. तसेच विद्यार्थ्यांनी अभयारण्य परिसरात भटकंती करून दुर्मीळ असा 'शेकरू' प्राणी व 'ब्लूमॉरमॉन' फुलपाखराची ओळख करून घेतली. दुर्मीळ औषधी वनस्पती, प्राणी यांच्या जाती - प्रजातींची माहिती करून घेतली. भीमाशंकर अभयारण्य व मंदिर परिसरातील प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या इत्यादि प्लास्टिककचरा जमा केला. विद्यार्थ्यांनी भीमा नदीच्या उगमामधील पाण्यातील विरघळलेल्या ऑक्सिजनची मात्रा शास्त्रीय पद्धतीने तपासली. विद्यार्थ्यांना सह्याद्रिच्या डोंगररांगांची प्राकृतिक रचना, हवामान, मृदा, जलप्रणाली आणि भीमाशंकर अभयारण्य व मंदिर परिसराची माहिती प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी दिली. वनसचेतन शिबीर व स्वच्छता अभियानाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज यांनी केले. या शिबिरात उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. निलेश बारणे, प्रा. शीतल बोऱ्हाडे, प्रा. दीपिका खांगटे, प्रा. रेश्मा रोडे, प्रा. प्रतिक्षा तनपुरे, प्रा. गौरी तेलंग व प्रशासकीय सेवक सचिन गायकवाड, अमोल बारणे उपस्थित होते.

२५ ते ३१ ऑगस्ट २०१७/४
खेड टाइम्स

# 'रासेयो'चे वनसचेतन शिबीर

राजगुरूनगर, (प्रतिनिधी) - येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भोरगिरी ते भीमाशंकर अभयारण्य परिसरात वनसचेतन शिबीर व स्वच्छता अभियानाचे आयोजित केले होते. यात सुमारे २१० स्वयंसेवक सहभागी झाले. विद्यार्थ्यांना निसर्गातील जैवविविधतेची माहिती व्हावी आणि पर्यटकांकडून अभयारण्य परिसरात टाकला जाणारा प्लास्टिकचा कचरा जमा व्हावा हा या उपक्रमामागील मुख्य हेतू होता. या वेळी विद्यार्थ्यांनी अभयारण्य परिसरात खुरप्याच्या साहाय्याने खड्डे घेऊन करंज, एरंडी, सुबाभूळ, जांभूळ, सीताफळ, करवंद, आंबा, चिंच, लिंब, शेवगा, बोर, बाभूळ या वृक्षांची लागवड केली.



भीमाशंकर : वनसचेतन शिबिरात प्लॅस्टिक कचरा गोळा करणारे विद्यार्थी.

# राजगुरू महाविद्यालयातर्फे वनसचेतन स्वच्छता अभियान

राजगुरुनगर, ता. १८ : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने भोरगिरी ते भीमाशंकर अभयारण्य परिसरात वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियानाचे आयोजन केले. यात सुमारे २१० स्वयंसेवक सहभागी झाले होते.

या वेळी विद्यार्थ्यांनी अभयारण्य परिसरात करंज, एरंडी, सुबाभूळ, बाभूळ, सीताफळ, करवंद, जेट्रोफा, आंबा, चिंच, लिंब, बकाना, शेवगा, बोर, बाभूळ या वृक्षांच्या दहा किलो बियांचे सेंद्रिय पद्धतीने बीजप्रक्रिया करून बीजारोपण केले. अभयारण्य परिसरात भटकंती करून दुर्मिळ अशा 'शेकरू' प्राणी व 'ब्लूमॉरमॉन' फुलपाखराची ओळख करून घेतली. दुर्मिळ औषधी वनस्पती, प्राणी यांच्या जाती-प्रजातींची माहिती करून घेतली. भीमाशंकर अभयारण्य व मंदिर परिसरातील प्लॅस्टिकच्या बाटल्या, पिशव्या इत्यादी घनकचरा जमा केला. विद्यार्थ्यांनी भीमा नदीच्या उगमामधील पाण्यातील विरघळलेल्या ऑक्सिजनची मात्रा शास्त्रीय पद्धतीने तपासली. ती १३ पीपीएम एवढी आहे. शुद्ध पाण्यातील ऑक्सिजनची कमीत कमी मात्रा ८ पीपीएम आवश्यक असते.

प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी परिसराची माहिती दिली. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज यांनी संयोजन केले. या शिबिरात उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. नीलेश काळे, प्रा. शीतल बोऱ्हाडे, प्रा. दीपिका खामगे, प्रा. रेश्मा रोडे, प्रा. प्रतीक्षा तनपुरे, प्रा. गौरी तेलंग व प्रशासकीय सेवक सचिन गायकवाड, अमोल बारणे उपस्थित होते.

१० पुढारी | पुणे, शनिवार १९ ऑगस्ट २०१७

# 'हुतात्मा राजगुरू'चे वनसचेतन शिबिर



वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियानातील विद्यार्थी.

राजगुरुनगर : प्रतिनिधी

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने श्रीक्षेत्र भीमाशंकर अभयारण्य परिसरात बुधवारी (दि.१६) वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. यात ११० स्वयंसेवक सहभागी झाले होते.

या वेळी विद्यार्थ्यांनी अभयारण्य परिसरात वृक्षांच्या १० किलो बियांचे सेंद्रिय पद्धतीने बीजारोपण करून रोपण केले. तसेच विद्यार्थ्यांनी अभयारण्य परिसरात भटकंती करून दुर्मीळ अशा 'शेकरू' प्राणी व 'ब्लूमॉरमॉन' फुलपाखराची ओळख करून घेतली. दुर्मीळ औषधी वनस्पती, प्राणी यांच्या जाती-प्रजातींची माहिती करून घेतली. भीमाशंकर अभयारण्य व मंदिर परिसरातील प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या इत्यादी घनकचरा जमा केला. विद्यार्थ्यांनी भीमा नदीच्या उगमस्थानातील पाण्यातील विरघळलेल्या ऑक्सिजनची मात्रा शास्त्रीय पद्धतीने तपासली. ती १३ पीपीएम एवढी आली. शुद्ध पाण्यातील ऑक्सिजनची कमीत कमी मात्रा ८ पीपीएम आवश्यक असते. विद्यार्थ्यांना सह्याद्रीच्या डोंगररांगांची प्राकृतिक रचना, हवामान, मृदा, वनसंपत्ती आणि भीमाशंकर अभयारण्य व मंदिर परिसराची माहिती प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी दिली.

वनसचेतन शिबिर व स्वच्छता अभियानाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज यांनी केले. या शिबिरात उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक, प्रा. नीलेश बारणे, प्रा. शीतल बोऱ्हाडे, प्रा. दीपिका म्हस्के, प्रा. रेश्मा रीठे, प्रा. प्रतीक्षा रूपूं, प्रा. गौरी तेलंग व प्रशासकीय सेवक सचिन गायकवाड, अमोल बारणे उपस्थित होते.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख